निशाण क्र.१५०

उलटतपास वादी साक्षीदार क्र.१ चा प्रतिवादी क्र.१,३,५ तर्फे विधिज्ञ श्री.पी.बी.सावंत यांचेमार्फत सुरू.

१२. माझे माहेर मुटाट तालुका देवगड आहे. माझे लग्न २००० साली झाले. मी सध्या मुटाट येथेच राहते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नापूर्वी माझा दावा मिळकतींशी संबंध नव्हता. माझे पती राजेंद्र सन २००५ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, लग्न झाल्यानंतर मी गढीताम्हाने येथे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती मयत झाले नंतर मी मुटाट गावी रहायला आले. दावा मिळकतीशी माझा संबंध माझे लग्न झालेपासून माझे पती मयत होईपर्यंतच होता असे म्हटलेतर चूक होईल.

१३. प्रस्तुत दावा तयार करताना कागदपत्रांविषयीची माहिती मी व वादी क्र.१ ने आमच्या वकिलांना दिली. वादी क्र.१ हे आज रोजी हजर आहेत. माझ्या सास—यांना मी पाहिले नाही. माझ्या सास—यांचे पूर्ण नाव मला माहीत आहे. त्यांचे नाव चिमाजी महादेव कदम होते. चिमाजी हे सन १९८४ साली मयत झाले. दावा मिळकतींचे सातबारा उतारे मी स्वत: पाहिले आहेत. दावा मिळकतीच्या सातबारा उता—यामध्ये कोणाकोणाची नावे आहेत याबाबत ज्यांनी मला माहिती आहेत तेवढयांची नावे मी सांगू शकते. सदर उता—यामध्ये विलास शामराव कदम, महादेव चिमाजी कदम, रोहिनी राजेंद्र कदम, संदेश राजेंद्र कदम एवढयांची नावे उता—यात आहेत याची मला माहिती आहे. राजेंद्र याचे नाव कधी व कसे उता—याला नोंद झाले याची मला माहिती आहे. राजेंद्रचे नाव पहिल्यांदा कोणत्या साली नोंद झाले याची मला निश्चित माहिती नाही. राजेंद्र यांचे नाव चिमाजी कदम यांचे वारस म्हणून नोंद झाले. त्यावेळी महादेव व राजेंद्र यांची नावे नोंद केली. केवळ या दोघांचीच नावे नोंद केली. त्यावेळी अशोक, अरविंद, सत्यवान, विठा व सुनंदा यांची नावे आम्ही लावली का याची मला माहिती नाही. यापूर्वी अशोक, अरविंद, सत्यवान, विठा व सुनंदा यांची नावे सातबारा उता—याला नोंद होती. सध्या यांची नावे नमूद नाहीत. मी शामराव चिमाजी कदम यांना पाहिले आहे. ते सन २००४ साली मयत झाले. अशोक चिमाजी कदम जिवंत नाहीत. अशोक हे कधी व कोठे

मयत झाले याची मला माहिती नाही. साक्षीदार सांगते की, अशोक हे माझ्या लग्नापूर्वी मयत झाले आहेत. अरविंद चिमाजी कदम यांची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, अरविंद चिमाजी कदम हे मयत झाले नसून बेपत्ता झालेले आहेत. अशोक, अरविंद व सत्यवान ही नावे मला माझ्या नव—याकडून कळाली. अरविंद मयत झाल्याबाबतचा दाखला किंवा कागदपत्र मी दाखल करू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अरविंद मयत आहे हे मी माझ्या पतीने सांगितले म्हणून मी सांगत आहे. अरविंद चिमाजी कदम हे मयत आहेत अशी नोंद मी कोठेही पाहिली नाही. अरविंद चिमाजी कदम यांच्या मृत्युबाबतची नोंद मी पुढील तारखेस दाखल करू शकते का हे मी आज सांगू शकत नाही. प्रस्तुत प्रकरण संपेपर्यंत मला अशी नोंद मिळाल्यास मी ते कागद दाखल करू शकते. रहाटेश्वर व गढीताम्हाने गावचा आमच्या जमिनींचा खाते क्रमांक मला सांगता येणार नाही. किती जमिनींसाठी आम्ही हा दावा दाखल केला आहे ते मला निश्चित सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती व्यतिरिक्त आमच्या जमिनी आहेत. साक्षीदार पुन्हा सांगते की, दावा मिळकती व्यतिरिक्त आमच्या जमिनी नाहीत. रहाटेश्वर गावात आमच्या जमिनी आहेत. रहाटेश्वर गावी सर्व्हे क्र.६५/३/४, ६८/२/५ व २अ, ६९/२/२, ६९/२/१, ७०/१/१ या मिळकती आमच्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सुर्यकांत राघोबा कदम, सुनिल राघोबा कदम, उल्का राघोबा कदम, पंढरीनाथ धोंडीराम कदम, सखाराम धोंडीराम कदम, दयानंद धोंडीराम कदम हे आमच्या चुलत कुटुंबातील आहेत. या चुलत कुटुंबाच्या व आमच्या सास—याच्या कुटुंबाच्या सामाईक जमिनी रहाटेश्वर येथे आहेत. त्या मिळकतींचा सर्व्हे क्र.३९/८क + १४अ, ३९/८क + ९/१३अ, ३६/५/१, ५/१८/३, ४०/८ब+९अ असे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या जमिनींना आमच्या कदम कुटुंबियांची नावे नोंद आहेत. या जमिनींची माहिती व कागदपत्रे मी माझ्या वकिलांना दावा दाखल करताना दिली होती. सर्व्हे क्र.४ हिस्सा क्र.२अ या जमिनीची मला माहिती नाही. विठ्ठल शिवराम बावकर हे नाव मी ऐकले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे क्र.४ हिस्सा क्र.२अ ही जमीन विठ्ठल शिवराम बावकर यांच्याकडे कुळवहिवाटीस आहे. या जमिनीच्या सातबारा उता—याला विठ्ठल शिवराम बावकर याचे नाव असल्याचे मी पाहिले नाही. आमचे चुलत कुटुंबिय व वर नमूद जमिनी या कामी समाविष्ट करण्यास

आम्हास अडचण नव्हती. देव रहाटेश्वर देवस्थानास या कामी पक्षकार करण्यास मला अडचण नव्हती.

१४. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वी सातबारा उता—याला शामराव चिमाजी कदम याचे एकटयाचेच नाव नोंद होते. हे म्हणणे खरे नाही की, शामराव यांनी स्वत: दावा जमिनींमध्ये झाडांची लागवड केली आहे. सर्व्हे क्र.२८ हिस्सा क्र.३ या वर्णनाच्या जमिनीबाबत मला माहिती आहे का हे मी सांगू शकत नाही. दाव्यात नमूद केलेल्या जमिनींबाबत सर्व्हे वर्णनावरून मी काही सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, बोरीची निपई या जमिनीमध्ये प्रतिवादी क्र.१ याने निवृत्त होवून आल्यानंतर आंबा कलमांची लागवड केली. गावामध्ये आमचे सामाईक वडिलोपार्जित घर आहे. त्या घराचा ग्रामपंचायत क्रमांक मला माहीत नाही. ते घर शामराव यांच्याच नावे आज देखील आहे. या घराबाबत दावा दाखल करते वेळी आम्ही आमच्या वकिलांना माहिती दिली नाही. या घराचा उतारा आम्ही वकिलांना नंतर दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे क्र.२ हिस्सा क्र.२० घरठाण या जमिनीत शामराव व त्याच्या मुलांनी स्वत:साठी घर बांधले. वडिलोपार्जित घराचे वाटप मागण्यास मला अडचण नव्हती. फेरफार क्र.२९६५ मी पाहिला आहे. साक्षीदार पुन्हा सांगते की, मी हा फेरफार पाहिला नाही. वंशावळीत दर्शविलेली विठा हिचे पूर्ण नाव मला माहीत नाही. मी तिला स्वत: पाहिली आहे. सुनंदा हिचे पूर्ण नाव मला माहीत आहे. सुनंदा हिला एक मुलगी व एक मुलगा आहे. विठा ही जिवंत आहे.

१५. मी प्रतिवादींकडे वाटप मागितले असे घडले होते. माझ्या म्हणण्यानुसार आम्ही विलास शामराव कदम याच्याकडे वाटप मागितले होते. गढीताम्हाने व रहाटेश्वर या गावात आमची किती खाती आहेत हे मला सांगता येणार नाही.

१६. हे म्हणणे खरे नाही की, मला कदम कुटुंबियांच्या वंशावळीबाबत काहीच माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, कदम कुटुंबियांच्या जमीन जुमल्यांबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही

// //

आता/सध्या दावा मिळकती कसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्या जमिनीमध्ये कोणाची वहिवाट आहे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा सरतपास दिला आहे व खोटी साक्ष देत आहे. माझ्या पेक्षा महादेव चिमाजी कदम यांना दावा जमिनींबाबत अधिक माहिती असू शकेल, याबाबत मला माहिती नाही.

उलटतपास पूर्ण,

फेरतपास नाही.

उलटतपास वादी साक्षीदार क्र.१ चा प्रतिवादी क्र.२० तर्फे विधिज्ञ श्री. आर.एस.राणे यांचेमार्फत सुरू

वारंवार पुकारता गैरहजर,

सबब, उलटतपास नाही.

उलटतपास वादी साक्षीदार क्र.१ चा प्रतिवादी क्र.२१ तर्फे स्वत:

प्रतिवादी क्र.२१ चा वारंवार पुकारता गैरहजर,

सबब, उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/—

दि.२६/०९/२०१८ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवगड